IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal
ISSN 2455-4375

# संदर्भ सेवा आणि संदर्भ सेवेचे बदलते स्वरूप

**श्री. विनायक दशरथ नाकतोडे**
प्रभारी ग्रंथपाल
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली (म.रा.)

**प्रस्तावना :**

ग्रंथालयाचे प्रमुख कार्य म्हणजे ग्रंथाची देवघेव करणे. कोणत्याही प्रकारच्या वाचकाला स्वत: पुढाकार घेऊन मदत करणे हे आधुनिक ग्रंथालयाचे कर्तव्य आहे. ग्रंथपाल हा अनेक प्रकारच्या साहित्यामधून वाचकाला आवश्यक असलेली माहिती पुरवितो तसेच इतर ग्रंथालयाशी संपर्क साधून वाचकाला आवश्यक असलेले ग्रंथ सुध्दा उपलब्ध करून देण्याचे कार्य करावे लागते. कर्तव्य आणि मदत करणे या दोन प्रकारच्या विचार सारणीतून संदर्भ सेवेचा उगम झाला.

संदर्भ सेवेचे प्रमुख अंग म्हणजे वाचकाला आवश्यक असलेले ग्रंथ आणि इतर वाचनीय साहित्य देणे ज्या अनेक साधनांद्वारे ग्रंथपाल वाचकांना ज्ञानाची पाणपोई मनसोक्तपणे पिण्याची संधी प्राप्त करून देतो त्या सेवेस संदर्भ सेवा असे म्हणतात.

**संदर्भ सेवेची व्याख्या :**

**1) Dr. S. R. Rangnathan :**

"Reference service is the establishing of contact between right reader and right book by personal service."

**2) James I. Wayer :**

"Reference service is systematic and informed personal aid in interpreting library collection for study and research."

**3) D. J. Foskett :**

"Reference service is the essentially humanism in practice, because the aim is to help people, in one way or other, to secure greater happiness through the possession knowledge."

**संदर्भ सेवेचे बदलते स्वरूप :**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांनी सांगितलेला चौथा सिद्धांत म्हणजे वाचकांचा वेळ वाचविला पाहिजे. या सिद्धांताचा आधार घेऊन ग्रंथालयामध्ये सर्वच प्रकारची व्यवस्था करता येते उदा. ग्रंथ साहित्य, कर्मचारी, सेवा, इतर साधने. तसेच ग्रंथालयामध्ये येणाऱ्या वाचकांचा वेळ वाचविण्यासाठी अनेक प्रकारच्या सेवा सुद्धा देण्यात येतात. उदा. ग्रंथसूचीय सेवा, सार लेखन, इलेक्ट्रॉनिक जर्नल्स, ओपॅक, ई–मेल सेवा, डिजिटल ग्रंथालयीन सेवा, ऑनलाईन लायब्ररी.

२० व्या शतकामध्ये ग्रंथालयाचे संगणकीकरण झाल्यामुळे ग्रंथालयाच्या व्यवस्थापणामध्ये बदल झालेले दिसून येत आहे. हे सर्व नवीन माहिती तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. नवीन माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग प्रत्येक विद्यापीठ, माहिती केंद्र यामध्ये करण्यात येऊ लागला. त्याचा परिणाम म्हणजे संदर्भ सेवेचे स्वरूप बदलून संगणकीय संदर्भ सेवा उदयास आली.

**ग्रंथालयीन संकेत स्थळाद्वारे संदर्भ सेवा :**

माहिती तंत्रज्ञानाचा विकास झाल्यामुळे अनेक ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. ज्या विद्यापीठ व विशेष ग्रंथालयांनी स्वत:च्या ग्रंथालयाचे संगणकीय पूर्ण केल्यामुळे ग्रंथालयातील सभासदांना अनेक प्रकारच्या सेवा देणे सुरू केले आहे. त्या सेवा पुढील प्रमाणे आहेत.

**1) On-Line Full Text CD/DVD Library Services :**

या सेवेमध्ये ई–बुक व ई–जर्नल्स च्या लेखकाची / प्रकाशकांची मंजूरीने एका सर्वरमध्ये संग्रहीत करून Full Text स्वरूपात प्रत्येक ई–बुक व ई–जर्नल्सची माहिती जे ग्रंथालयाचे वाचक असतात त्यांना पुरविणे शक्य आहे.

**2) On-Line Full Text E-Journal :**

या सेवेमध्ये ग्रंथालयात प्राप्त झालेल्या CD स्वरूपातील ई–जर्नल्सची माहिती वाचकांना इंटरनेटच्या माध्यमातून पाहावयास मिळते. ग्रंथालयाच्या वाचकांना नियतकालिक पाहावयाची झाल्यास त्यांना User ID आणि Password देण्यात येते त्यामुळे इंटरनेटच्या माध्यमातून संबंधित ग्रंथालयाचा वाचक ई–जर्नल्स कोणत्याही वेळी आणि कुठूनही वाचन करू शकतो.

**3) On-Line Full Text Manuscripts Database :**

काही ग्रंथालयामध्ये दुर्मिळ असे हस्तलिखित उपलब्ध असतात. सदर दुर्मिळ असलेले साहित्य टिकून राहण्यासाठी त्या साहित्याचे डिजिटायजेशन करून वाचकांना / संशोधकांना हस्तलिखिते इंटरनेटच्या माध्यमातून पाहण्याची सोय करून दिल्या जाते.

**4) On-Line Full Text Rare Books Database :**

काही ग्रंथालयाची स्थापना १०० वर्षाच्या पूर्वी पासून झालेली आहे. त्या ग्रंथालयामध्ये असलेले काही वाचन साहित्य हे दुर्मिळ असतात. त्या वाचन साहित्याचे डिजिटायजेशन करून Full Text स्वरूपात इंटरनेटच्या माध्यमातून संबंधित ग्रंथालयाद्वारे वाचकाकरिता पाहण्याचीसोय उपलब्ध करून देण्यात येत आहे. अशा नवीन प्रकारच्या संदर्भ सेवेमुळे वाचकांना केव्हाही, कुठूनही दुर्मिळ वाचन साहित्य पाहण्याची, वाचण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

**5) On-Line Full Text Theses :**

काही मोजक्या शैक्षणिक ग्रंथालयांनी संशोधकाने सादर केलेल्या प्रबंधाची Full Text स्वरूपातील प्रत CD Rom मध्ये आचार्य पदवी कक्षाकडून ग्रंथालयाकडे पाठविली जाते. त्या ग्रंथालयाद्वारे प्रबंधाची सर्वरमध्ये कॉपी करून वाचकांना उपलब्ध करून दिली जाते.

**6) FAQ :**

या प्रकारच्या सेवेमध्ये ग्रंथालयाच्या संकेत स्थळावरून प्रश्न विचारून माहिती मिळण्याची सोय उपलब्ध करून दिल्या जाते. अशा सेवेस Advance Reference Service असे म्हणतात. ही सेवा फक्त ग्रंथालयाच्या वाचकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाते.

**7) E-Mail :**

या सेवेमध्ये संबंधीत ग्रंथालयाच्या वाचकांना संकेत स्थळावर ई–मेल करून आवश्यक असलेली माहिती विचारण्याची सोय उपलब्ध करून दिल्या जाते, तसेच ई–मेल द्वारे एक ग्रंथालय दुसऱ्या ग्रंथालयाशी

पत्र व्यवहार करून संबंधित सभासदांना माहिती पुरविण्यात येते. ही सेवा सुद्धा Advance संदर्भ सेवेचा प्रकार आहे.

**8) Mobile SMS :**

या सेवेमध्ये ग्रंथालयाचे सभासदत्व नोंदणी वेळी आवडीच्या विषयाबाबत विचारणा करण्यात येते आणि सभासदत्व अर्जावर तशी नोंद करण्यात येते. ग्रंथालयामध्ये सभासदाच्या आवडीचे विषयावर नवीन साहित्य /ग्रंथ आल्यास त्याप्रमाणे त्या ग्रंथाची माहिती SMS द्वारे सभासदांना पुरविण्यात येते. अशा सेवेकरीता सभासदांकडून SMS पाठविण्याकरिता काही शुल्क आकारण्यात येते. भविष्यामध्ये या सेवेत इतर माहितीसुध्दा पाठविण्याची सोय करता येणे शक्य आहे.

**समारोप :**

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संदर्भ सेवेला अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ग्रंथालयाच्या बाबतीत वाचकांचे समाधान करतांना बदलत्या परिस्थितीशी जुळवून वाचकांना द्यावयाच्या संदर्भ सेवा परिणामकारकपणे देण्याकरिता सतत नाविण्याचा ध्यास घेणे आवश्यक ठरते. माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवांचा अंतर्भाव करून वाचन साहित्याचा वाचकांनी जास्तीत जास्त वापर केला पाहिजे असे बघितले जाते.

**संदर्भ सूची :**


१) काळे, किशोर; माहिती सेवा व साधने, नागपूर : विश्व पब्लिशर्स ॲड डिस्ट्रिब्युटर्स, प्रथम आवृत्ती, २०१०.

२) जैन, प्रकाश आणि इतर, सुलभ ग्रंथालय ाास्त्र, नागपूर : विश्व पब्लिशर्स ॲड डिस्ट्रिब्युटर्स, २०१३.

३) पवार, ंकर पा., आणि इतर, ग्रंथालय आणि माहिती ाास्त्र सेट व नेटच्या अभ्यासक्रमाप्रमाणे, कोल्हापूर : फडके प्रकाशन, चौथी आवृत्ती, २०१२.

४) लेले, वसंत विश्वनाथ, समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (प्रश्नोत्तरे), पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१५.

५) https://www.google.com